सत्यमेव जयते

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
निश्चय बिल्डिंग, १० वा मजला,
तुकाराम भिकाजी कदम मार्ग,
भायखळा (पू), मुंबई - ४०० ०२७.

दुरध्वनी क्र. :(०२२)- २२८२०३११
E-mail : adg.traffic.hsp@mahapolice.gov.in

जा.क्र. अपोमसं (वा.)/४५/नियोजन/ई-चलान/परिवहन मंत्री बैठकीच्या अनुषंगाने परिपत्रक/ ८४४ /२०२६ दिनांक : /०३/२०२६

04 MAR 2026

प्रति,

१) **पोलीस आयुक्त**, मुंबई शहर
**पोलीस आयुक्त**- ठाणे शहर/पुणे शहर/नवी मुंबई/नागपूर शहर/पिंपरी-चिंचवड/नाशिक शहर/छत्रपती संभाजी नगर/सोलापूर शहर/ अमरावती शहर/ मिरा भाईंदर वसई विरार/ लोहमार्ग, मुंबई.

२) **पोलीस अधीक्षक**- अहिल्यानगर/ अकोला/अमरावती/ छत्रपती संभाजी नगर ग्रा./बीड/ बुलढाणा/ भंडारा/ चंद्रपूर/जालना/ धाराशिव/नांदेड/लातूर/परभणी/हिंगोली/कोल्हापूर/पुणे ग्रा./सांगली/सातारा/सोलापूर ग्रा./गडचिरोली/ गोंदिया /नागपूर ग्रा./ धुळे/ जळगाव/ नाशिक ग्रा./नंदुरबार/ रायगड/ रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे ग्रा./ पालघर / वाशिम/ यवतमाळ/ वर्धा

३) **पोलीस अधीक्षक**- महामार्ग पोलीस ठाणे/पुणे/ छत्रपती संभाजी नगर /रायगड व नागपूर परिक्षेत्र.

**विषय** :- महाराष्ट्र राज्यातील विविध वाहतूकदार संघटनांच्या प्रतिनिधींची मा. मंत्री (परिवहन), महाराष्ट्र राज्य यांचे सोबत झालेल्या बैठकीमध्ये ई चलान बाबत उपस्थित केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबत.

**संदर्भ**:- १) दि. ०२/०३/२०२६ रोजी मा. मंत्री (परिवहन), महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली विविध वाहतूकदार संघटना यांचे समवेत झालेली बैठक.
२) या कार्यालयाचे प्रलंबित ई चलान वसूली व वाहन जप्तीबाबतची आदर्श कार्यप्रणालीचे परिपत्रक जा.क्र. अपोमसं(वा.)/४५/नियोजन/ई चलान/ई चलान परिपत्रक/३५५९/२०२४, दि. ११/१२/२०२४

********

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून महाराष्ट्र राज्यातील विविध वाहतूकदार संघटना यांनी दिनांक ०५/०३/२०२६ रोजी पुकारलेल्या देशव्यापी संपाच्या अनुषंगाने मा. मंत्री (परिवहन), महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०३/२०२६ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीमध्ये विविध वाहतूकदार संघटनांचे प्रतिनिधी यांनी वाहतूक पोलीस हे रोडवर अनावश्यक चालत्या वाहनांना रोडचे बाजूला थांबवितात. तसेच त्यांचे कडून जबरदस्तीने प्रलंबित ई चलान दंड भरून घेतात. त्याकरीता वाहन दिर्घकाळ थांबवून ठेवतात. दंडाची रक्कम न भरल्यास पैशांची मागणी करतात. तसेच चालकांना वाहन/ कागदपत्रे जप्त करू अशी दमदाटी करतात व चालकांशी उध्दट पध्दतीने वागतात अशा प्रकारे वाहतूक पोलीसांकडून चालकांना नाहक त्रास दिला जातो असा मुद्दा उपस्थित केला. सदर प्रकरणी मा. मंत्री (परिवहन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अशा प्रकारच्या पोलीसांच्या वर्तनाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

ई चलान च्या प्रलंबित दंड वसूली व वाहन जप्तीच्या कारवाईच्या बाबतीत या कार्यालयाकडून आदर्श कार्यप्रणालीचे परिपत्रक जारी करण्यात आले असून त्यामध्ये ई चलान केसेसच्या तडजोड शुल्काची रक्कम वाहनचालक हे स्वईच्छेने भरण्यास तयार असतील, तरच ती भरणा करून घ्यावी तसेच वाहन जप्तीची कार्यवाही ही मा. न्यायालयाच्या आदेशानेच करावी याबाबतचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. परंतु वाहतूक पोलीस अधिकारी/ अंमलदार हे सदर परिपत्रकाचे पालन करत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहे. सदरची बाब ही जनमानसात पोलीसांची प्रतिमा मलीन करणारी आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी याद्वारे निर्देशित करण्यात येते की, वाहन चालकांना प्रलंबित ई चलानचा दंड भरून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती अथवा पैशांची अवैध मागणी करण्यात येऊ नये. तसेच वाहन चालकांशी सौजन्याने वागणेबाबत स्पष्ट निर्देश वाहतूक पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना दयावेत. वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देशांचे तसेच ई चलान दंड वसूलीबाबत या कार्यालयाकडून जारी केलेल्या परिपत्रकाचे पालन करण्यास कसुर करणाऱ्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे विरूध्द शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्यात यावी.

(प्रविण साळुंके)
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
महाराष्ट्र राज्य मुंबई

Scanned with OKEN Scanner